GTL INFRASTRUCTURE

GLOBAL Group Enterprise

# GTL Infra buys Aircel towers for $1.8 billion

Publication: Prahar, Date: January 14, 2010

## मोबाइल टॉवर व्यवसायावर फडकला मराठी झेंडा

**मुंबई (प्रतिनिधी) :** मोबाइल टॉवर व्यवसायातील तीव्र स्पर्धेवर मात करीत 'जीटीएल' या आघाडीच्या समूहाने मोबाइल सेवा पुरवठादार 'एअरसेल' या कंपनीचे १७ हजार ५०० मोबाइल टॉवर आपल्या ताब्यात घेतले. रोख ८ हजार ४०० कोटी रुपयांचा हा खरेदी व्यवहार कॉर्पोरेट इतिहासातील पहिली घटना मानण्यात येत आहेत. फोर्ब्सच्या भारतातील अव्वल १० अब्जाधीशांच्या यादीत स्थान मिळविलेले मराठी उद्योजक आणि जीटीएल इन्फ्राचे अध्यक्ष मनोज तिरोडकर यांनी रिलायन्स, टाटा यासारख्या बड्या कंपन्यांवर मात करून टॉवर व्यवसायावर मराठी झेंडा फडकवला आहे.

विनय आवटेकर



- 'एअरसेल'च्या टॉवरवर 'जीटीएल'चा ताबा
- रोख ८ हजार ४०० कोटी रुपयांचा व्यवहार
- १७ हजार ५०० टॉवर ताब्यात

एअरसेल आणि तिच्या उपकंपन्यांची टॉवर व्यवसायातील मालमत्ता विशेष उद्देशासाठी स्थापन करण्यात आलेल्या कंपनीच्या माध्यमातून खरेदी करण्याच्या प्रस्तावाला जीटीएल समूहातील जीटीएल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या संचालक मंडळाच्या गुरुवारी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सर्व आवश्यक त्या मान्यतेसह हा खरेदी व्यवहार एप्रिल-मेपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती कंपनीचे अध्यक्ष मनोज तिरोडकर यांनी दिली.

या खरेदी व्यवहारानुसार एअरसेलने पुढील तीन वर्षांत अतिरिक्त २० हजार टॉवर साइट्स जीटीएल इन्फ्राला देण्याचे मान्य केले आहे. या खरेदीमुळे जीटीएलचा महसूल पुढील पाच वर्षांत ८ हजार ५०० कोटी रुपये ते १७ हजार कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याचे तिरोडकर यांनी स्पष्ट केले.

टॉवरची संख्या वाढल्यामुळे शहरी भागातील नवीन २ जी आणि ३ जी ग्राहकांना सेवा देणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर देशातल्या ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा मनोदय तिरोडकर यांनी व्यक्त केला.

जीटीएल इन्फ्राकडे सध्या २३ हजारपेक्षा जास्त मोबाइल टॉवर असून या खरेदीनंतर ही देशातील सर्वात मोठी दूरसंचार पायाभूत सुविधा देणारी कंपनी ठरली आहे.

एअरसेलकडे ३८ हजार टॉवर असून त्यापैकी १७ हजार टॉवर कंपनीचे स्वतःचे आहेत. मलेशियातील मॅक्सिस कम्युनिकेशन्स या कंपनीचे जीटीएलमध्ये ७४ टक्के भागभांडवल आहे.